# आंतरविद्याशाखीय शैक्षणिक सहकार्य करार

## तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती मराठी विभाग आणि पत्रकारिता विभाग सहकार्य करार (2021-22 ते 2025-26)

मराठी विभागातील पदवी आणि पदव्युत्तर विभागात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांची भाषिक कौशल्ये अधिक विकसित व्हावी यासाठी पत्रकारिता विभाग व मराठी विभाग परस्परांशी करारांतर्गत पुढील पाच वर्षे सहकार्य करार करीत आहोत.

**करारांतर्गत बाबींचा तपशील पुढीलप्रमाणे -**

१. मराठी विभागात पदवी आणि पदव्युत्तर स्तरावर शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांचे भाषिक कौशल्य विकसित व्हावे यासाठी उपलब्ध वेळेनुसार पत्रकारिता विभाग मराठी विभागातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन आणि त्यांच्याकडे उपलब्ध असणाऱ्या साधन सामग्रीचा उपयोग विद्यार्थांना करता येईल. विविध कार्यक्रमांचे निवेदन स्वतः तयार करून त्याचे सादरीकरण कसे करावे, प्रसंगी संवाद साधण्याचे थेट कौशल्य कसे विकसित करावे, यासाठी पत्रकारिता विभाग सहकार्य करणार आहे.

२. प्रसार माध्यमांसाठी प्रभावी लेखन कसे करावे आणि त्याचे सादरीकरण कसे असावे,यासाठी विद्यार्थ्यांचे प्रत्यक्ष सादरीकरण पत्रकारिता विभागाच्या सहकार्याने करून घेण्यात येईल. उदा. जाहिरातलेखन, मुलाखत लेखन, निवेदन कौशल्य, जाहिरात तयार करण्याची पद्धती (Making Prosses)

३. प्रत्यक्ष मुलाखत कशी घ्यावी व त्याचे सादरीकरण कसे करावे ? यासाठी पत्रकारिता विभाग त्यांच्याकडे उपलब्ध असलेला स्टुडिओ ध्वनीमुद्रणासाठी मराठी विभागात शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देईल.

४. कथा-कविता-स्वगत-नाट्याश इत्यादीचे अभिवाचन करून त्याचे ध्वनिमुद्रण करण्यासाठी पत्रकारिता विभाग मराठी विभागातील विद्यार्थी आणि प्राध्यापक यांना पूर्णतः सहकार्य करेल.

५. मराठी विभागातील प्राध्यापकांना ई-कन्टेन्टस(e-content) किंवा तत्संबंधी शैक्षणिक साहित्य तयार करण्यासाठी आवश्यक असणारी सर्व प्रकारची तांत्रिक मदत व

सहकार्य पत्रकारिता विभाग करेल असेही या शैक्षणिक करारांतर्गत ठरविण्यात आलेले आहे.

तरी वरील तरतुदीस आपली मान्यता असल्याचे या लेखी संमतीपत्रान्वये मराठी व पत्रकारिता विभागाच्यावतीने आंतरविद्याशाखीय शैक्षणिक सहकार्य करार करीत आहोत .

प्रा.रणजित पंडित
पत्रकारिता विभाग प्रमुख

डॉ.रंजना नेमाडे
मराठी विभाग प्रमुख

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

प्राचार्य
तुळजाराम चतुरचंद महविद्यालय, बारामती

तु.च.कॉलेज,बारामती
आवक नंबर: 76202
दिनांक 4 APR 2022